.. Shri Rama Arati ..

# ॥ श्री राम आरती ॥

स्वस्वरूपोन्मुबुद्धि वैदेही नेली ।
देहात्मकाभिमानें दशग्रीवें हरिली ।
सद्विवेकमारूतिनें तच्छुद्धि आणिली ।
तव चरणांबुजि येऊनि वार्ता श्रुत कली ॥ १॥

जय देव जय देव जय निजबोधा रामा ।
परमार्थे आरती सद्भावें आरती परिपूर्णकामा ॥ धृ ॥

उत्कट साधुनि शिळा सेतु बान्धोनि ।
लिंगदेहलंकापुरी विद्धवंसोनी ।
कामक्रोधादिक राक्षस मर्दूनी ।
देह अहंभाव रावण निवटोनि ॥ जय ॥ २॥

प्रथम सीताशोधी हनुमन्त गेला ।
लंकादहन करूनी सखया मारीला ।
वधिला जंबूमाळी भुवनी त्राहटीला ।
आनंदाची गुढी घेऊनिया आला ॥ जय ॥ ३॥

निजबळें निजशक्ती सोडविली सीता ।
म्हणुनी येणें झाले अयोध्ये रघुनाथा ।
आनंदे ओसंडे वैराग्य भरता ।
आरती घेऊनि आली कौसल्या माता ॥ जय ॥ ४॥

अनुहत वाजिंत्रध्वनि गर्जती अपार ।
अठरा पद्मे वानर करिती भुभुःकार ।
अयोध्येसी आले दशरथ कुमार ।
नगरी होत आहे आनंद थोर ॥ जय ॥ ५॥

सहज सिंहासनी राजा रघुवीर ।
सोहंभावें तया पूजा उपचार ।
सहजांची आरती वाद्यांचा गजर ।

माधवदासस्वामी आठव ना विसर ॥ जय ॥ ६॥

इति

---

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 23, 1999